# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात मा. प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांचे शुभहस्ते व मा. प्रभारी प्र–कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण व ध्वजारोहण असा संयुक्त समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी या समारंभास उपस्थित रहावे. ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/379
दिनांक : 13 FEB 2026

I/C संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थीनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
४. मा. कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. वित्त व लेखा अधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या कार्यालयास माहितीसाठी.
५. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व विद्यापीठ गीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
६. वाहन विभाग प्रमुख यांनी अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार यांना वाद्ये आणणेसाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
५. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रमाच्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
७. अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठिकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाची देखभाल पहावी.
८. उद्यान विभाग यांनी ध्वजारोहण परिसरातील बागेची ठाकठिकता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी व ध्वजारोहण कार्यक्रमापूर्वी मा. कुलगुरु यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण केला जाईल याची नोंद घ्यावी.
९. नोटीस बोर्डवर लावणेसाठी –

| | |
|---|---|
| १) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३ | २) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३ |
| ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन | ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय. |
| ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन | ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह |

१०. श्री. डी आर चौगुले व श्री. एस. एल. पाथरवट, जमादार यांनी दोन शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वत: उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
११. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहण प्रसंगी ध्वज हाताळण्यासाठी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

**टिप : सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

——०००——